# ज़िल्हा व सत्र न्यायालय, परभणी

संदर्भ :- १. मा. उच्च न्यायालय, मुंबई गोपनीय पत्र क्रमांक बी.(जन) ५६०१/५७/२०२४/१६४९, दिनांक ०५ सप्टेंबर, २०२४.
२. जिल्हा न्यायालय, परभणी यांनी दिनांक ०५ सप्टेंबर, २०२४ रोजी प्रसिध्द केलेली शिपाई या पदाची निवड यादी.

## कार्यालयीन आदेश क्र. ( ३४० )

मा. उच्च न्यायालयाचे संदर्भीय पत्र क्र. १ मध्ये निर्देशीत केल्याप्रमाणे जिल्हा व सत्र न्यायालय, परभणी मार्फत दिनांक ०५ सप्टेंबर, २०२४ रोजी शिपाई या पदाची निवड/प्रतिक्षा यादी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. शिपाई पदाच्या निवड/प्रतिक्षा यादीमधील उमेदवारांना नेमणुक देणे बाबत प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, परभणी हया खालील प्रमाणे आदेश निर्गमीत करीत आहेत.

सदरचे आदेश दिनांक २४ सप्टेंबर, २०२४ पासुन अंमलात येतील.

| अ.क्र. | निवड यादीमध्ये निवड झालेल्या उमेदवाराचे नांव. | नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|
| १ | श्री. हर्षद सुभाष सरोदे,<br>शिपाई पदाची निवड यादी सन-२०२४ मधील अ.क्र. (०३) वरील उमेदवार. | यांना शिपाई या पदावर तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यात येत असून त्यांची नेमणुक अपर जिल्हा न्यायालय, हिंगोली यांचे आस्थापनेवर जिल्हा न्यायाधीश - १, हिंगोली यांचे न्यायालयात श्री. शेख खालेद खुर्शिद, शिपाई यांच्या ठिकाणी पदस्थापना करण्यात येत आहे. |
| २ | श्री. राम अंकुश खापरे,<br>शिपाई पदाची निवड यादी सन-२०२४ मधील अ.क्र. (०४) वरील उमेदवार. | यांना शिपाई या पदावर तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यात येत असून त्यांची नेमणुक दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, जिंतुर यांचे आस्थापनेवर श्री. ए.जी. ढाले, शिपाई यांच्या ठिकाणी पदस्थापना करण्यात येत आहे. |

**नेमणुकीच्या अटी व शर्ती :**

०१. उपरोक्त नवनियुक्त उमेदवाराने कामावर रुजु झाल्यानंतर कार्यालय प्रमुखांनी उमेदवारास एकनिष्ठतेची शपथ दयावी व वैद्यकीयदृष्टया पात्र असल्याबाबतचे प्रमाणपत्र घ्यावे आणि उमेदवाराकडुन नियमानुसार आवश्यक ती कागदपते घ्यावी.

०२. उमेदवाराने एक महिण्याची आगाऊ नोटीस दिल्याशिवाय राजीनामा दिला तर त्यांना एक महिन्याचे वेतन सरकार जमा करावे लागेल.

०३. वरील उमेदवारास शासन निर्णय वित्त विभाग क्र. अंनियो-१००५/१२६/सेवा-४, दिनांक ३१/१०/२००५ आणि शासन निर्णय क्र. अंनियो-१००७/१८/सेवा-४, दिनांक ०७/०७/२००७ नुसार नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन लागु राहील.

०४. नवनियुक्त उमेदवाराने प्रस्तुत आदेश प्राप्त झाल्यानंतर एक महिन्याच्या आत पदस्थापनेच्या ठिकाणी रुजु व्हावे. जर विहीत मुदतीत पदस्थापनेच्या ठिकाणी रुजु झाला नाही तर त्याचे नांव निवड यादीतुन कमी करण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

०५. नवनियुक्त उमेदवार संबंधीत आस्थापनेवर रुजु झाला किंवा कसे? या बाबतचा अहवाल संबंधीत कार्यालय प्रमुखांनी जिल्हा न्यायालयास त्वरीत सादर करावा.

जा.क्र./आस्था/ब-४/ 10016/२०२४
जिल्हा व सत्र न्यायालय, परभणी
दिनांक : २१ सप्टेंबर, २०२४.

23/09/2024
(उज्वला म. नंदेश्वर)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
परभणी

प्रतिलिपी माहिती व योग्य त्याकार्यवाहीस्तव :-

०१- मा. जिल्हा न्यायाधीश-१, हिंगोली.
०२- मा. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, जिंतुर
०३- प्रबंधक, जिल्हा न्यायालय, परभणी.
०४- मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश यांचे स्वीय सहाय्यक, जिल्हा न्यायालय, परभणी
०५- अधीक्षक (प्रशासन), जिल्हा न्यायालय, परभणी.
०६- सहा. अधीक्षक (रोखा व वित्त), जिल्हा न्यायालय, परभणी.
०७- श्री. हर्षद सुभाष सरोदे, रा. डॉ. आंबेडकर नगर, त्रिरत्न बुध्द विहाराजवळ, पो. शिवाजी नगर, नांदेड ता.जि. नांदेड (मो.नं. ७०८३३९१९५७)
मार्फत - मा. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, नांदेड.
०८- श्री. राम अंकुशराव खापरे, रा. कसार पो. वस्सा ता. जिंतुर जि. परभणी (मो.नं. ७२६४०८१८४७)
**मार्फत — मा. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, जिंतुर.**
०९- संगणक विभाग प्रमुख, जिल्हा न्यायालय, परभणी यांना देऊन निर्देशीत करण्यात येते की, सदर कार्यालयीन आदेश जिल्हा न्यायालय परभणीच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करावा.

23/9/2024
प्र.प्रबंधक,
जिल्हा न्यायालय, परभणी.